
ISBN : 978-93-88732-09-3



# अण्णा भाऊ साठे : समताधिष्ठित समाज व्यवस्थेचे तत्वज्ञ

संपादक

विठ्ठल गुडे

नवनाथ पवळे

दयाराम मस्के

Scanned by TapScanner

ISBN : 978-93-88732-09-3

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | अण्णाभाऊ साठे : जीवन,साहित्य आणि कार्य<br>प्रा.डॉ.आहिरे भास्कर मुरलीधर | 10 |
| 2. | अण्णाभाऊ साठे- जीवन, साहित्य आणि कार्य<br>डॉ. राणी जगन्नाथराव जाधव | 15 |
| 3. | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक विचार<br>गोकर्णा दगडू शिंदे | 21 |
| 4. | अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य आणि कार्य<br>प्रा.डॉ.रमेश वसंतराव गटकळ | 26 |
| 5. | समाज क्रांतीचे जननायक: अण्णाभाऊ साठे<br>डॉ. भालेराव जे.के. | 31 |
| 6. | अण्णाभाऊ साठे यांचे जीवन साहित्य आणि कार्य<br>डॉ.जे.बी.कांगणे. | 34 |
| 7. | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे<br>प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे | 40 |
| 8. | **अण्णा भाऊ साठे - एक अनुभवाचे विद्यापीठ**<br>**डॉ. लहूकुमार खंडाळे** | **47** |
| 9. | जागतिक संदर्भात अण्णाभाऊ साठेंची प्रासंगिकता<br>मनिषा बाळासाहेब बल्लाळ | 50 |
| 10. | अण्णा भाऊसाठे यांच्या लेखनातील सामाजिकतेचे वास्तव चित्रण:कादंबरी वाङ्मय प्रकाराच्या अनुषंगाने<br>प्रा.डॉ. रेखा कचरूजी मेश्राम | 54 |
| 11. | अण्णा भाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक<br>डॉ. एन.व्ही. शिंदे | 59 |
| 12. | दलित साहित्य आणि अण्णाभाऊंची दलित कथा आणि ग्रामीण कादंबरी<br>प्रा. डॉ. नंदकुमार शंकरराव इंगळे | 63 |
| 13. | **अण्णाभाऊ साठे - मानवतावादी साहित्यिक**<br>प्रा. निवृत्ती मारोतराव टार्फे | **70** |




Scanned by TapScanner

ISBN : 978-93-88732-09-3

# अण्णाभाऊ साठे- जीवन, साहित्य आणि कार्य

**डॉ. राणी जगन्नाथराव जाधव**
गृह विज्ञान विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर गढी,
ता. गेवराई जि. बीड.

---

**सारांश**

तुकाराम भाऊराव उर्फ अण्णाभाऊ साठे महाराष्ट्राला एक शाहीर म्हणून परिचित असले तरी कथा, कांदब-या नाटक, कविता, हे
साहित्य प्रकारही त्यांनी ताकदीने हाताळले तमाशा या कलेला लोक नाटयाची प्रतिष्ठा मिळून देण्याचे श्रेय अण्णाभाऊ साठे यांना दिले जाते. अण्णाभाऊंचे जीवन व वाड.मय अजूनही लोकांपर्यंत पोहचले नाही. कोणत्याही शाळेत अथवा विदयापीठात शिक्षण न घेता म्हणून अशिक्षीत असतानाही. त्यांनी विपुल साहित्य लेखन केले ज्या अस्पृश्य जातीत त्यांचा जन्म झाला. त्या मधुन ते थोर साहित्यिक झाले आणि हजारो वर्षा पासुन हिंदु धर्माने जे दैन्य दास्य लावून अस्पर्श गुलाम केले होते त्या गुलामगिरीला त्यांनी पराभूत केले परंतु मध्ययुगात संत तुकारामाच्या अभंगाना जसे इंद्रयाणीत बुडविले त्याच प्रमाणे या आधुनिक युगातील तुकारामांची म्हणजे अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य ही उपेक्षीत ठेवले गेले. मध्ययुगीन तुकाराम व आधुनिक तुकाराम अर्थात अण्णाभाऊ साठे या दोघांच्याही वाटयाला बाम्हणी वेदना दिल्या खरा इतिहास संस्कृती याने घडविला नसुन तत्वज्ञ कलावंत घडवित आसतात. बुध्द-फुले-आंबेडकर हे तत्ववेत्ते निर्माण करतात त्याच प्रमाणे कवी कलावंतही जन्मास घालतात. लेखक लोकांच्या मनावर मानवता कोरतात- जीवनाला सुंदर करणारा एक कलावंाचा वर्ग समाजाच्या कुरुपते बद्दल बोलत असतो जीवना सोबत वाड्.मयालाही सौदर्य देत असातो. अण्णाने मराठी साहित्याला संस्कृतीला असेच अमर्याद सौदर्य दिले त्यांनी मोठया कष्टातून व त्यागातून ते उभे केले. आजकाल अण्णभाऊंनी लोक प्रबोधनांची जीवन निष्ठा व तत्वनिष्ठा स्वीकारली ब्राम्हणशाही व भांडवलशाही भारतीय समाज त्यांच्या कथा साहित्यातून व शाहीरी पोवाडयातून स्थिती वादी विचारावर प्रहार केला आणि परिवत्रनवादी विचाराला गतीमानता दिली.

**महत्वाचे शब्द(Key word)**

साहित्यकृती, साहित्यिक, परिवर्तनवादी विचार, लोकप्रबोधन

**प्रस्तावना**

साहित्यरत्न तुकाराम भाऊराव तथा अण्णाभाऊ साठे म्हणजे आजच्या समाज क्रांतीची धगधगती एक मशाल होती, या धगधगत्या मशालीने आपल्या सृजनशिलते द्वारे विविध कथा, कांदबऱ्या,पोवाडे, कविता, लेखक, नाटक अशा अनेक विविध साहित्य प्रकारांना जन्म दिली व बहुजनांच्या उपेक्षीत शुद्र अतिशद्र कामगार, कष्टकरी शेतक-यांच्या वेदनेला साहित्याच्या व चळवळीच्या माध्यमातून वाचा फोडली व जीवनाच्या अखेर पर्यंत समाज प्रबोधनाचे समाजपरिवर्तनाचे व समाज जागृतीचे महान कार्य त्यांनी केले. परंतु मध्ययुगीन तुकारामा प्रमाणेच या आधुनिक तुकारामाला (अण्णाभाऊ साठे) यांच्या वाटयाला तत्कालीन ब्राम्हणी प्रवृतीने अतोनात वेदना दिल्या अण्णाभाऊ प्रतिकुल परिस्थितीतून वर आले आणि त्यांनी साहित्य संस्कृतीचा गड जिंकला परिस्थिती त्यांना मारुन टाकण्यास निघाली होती पण त्यांनीच परिस्थितीला मारले. त्यांनी मोठया खडतर परिस्थितीतून हे युध्द जिंकले व आपल्या साहित्यकृतीच्या माध्यमातून आपला ध्वज रशिया प्रदेशात रोवला. मानवी जीवनाला शोषण विरोधी तत्व निष्ठेची जाणीव

ISBN : 978-93-88732-09-3

असली पाहिजे. शोषितांच्या आयुष्याला प्रबोधनाची चेतना पाहिजे हेच तत्व शोषित घटकाला हळूहळू पण निश्चित मार्गाला नेते हाच तत्व सिध्दांत आण्णाभाऊंच्या जीवनातून व साहित्यातून साकार झाला आहे.

**समस्या सुत्रण-**

एकोणीसाव्या शतकात भारतीय समाजा मध्ये अनेक समाज सुधारक होवून गेले. त्यांनी तत्कालीन सामाजीक समस्या सोडविण्यासाठी समाज परिर्वनासाठी समाज परिवर्तनाच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा करण्याचे मौलिक कार्य केले. वैदिक कालखंडात तयार करण्यात आलेल्या धर्म ग्रंथानुसार तत्कालीन समाजात वर्णव्यवस्था प्रस्थापित झालेली होती आणि या वर्ण व्यवस्थे मुळे अस्पृश्य गावकुसा बाहेरील सामाजाला अत्यंत वेदना दायी हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्या विविध समस्या निर्माण झालेल्या होत्या. अशा या समाजातील वंचित, शोषीत घटकाला सन्मानाचे जीवन देण्यासाठी आयुष्यभर आपल्या विविध साहित्यकृती चळवळीच्या माध्यमातून अवितरपणे लढणा-या एक महान योध्दयाचा अर्थात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन साहित्य आणि कार्याचा आढावा येथे घेण्यात आला आहे.

**संशोधन विधान-**

अण्णाभाऊ साठे यांचे जीवन साहित्य आणि कार्य या अनुषंगाने हा संशोधन विषय घेवून तत्कालीन समाजातील उपेक्षीत वंचित शोषित घटकांच्या समस्या आपल्या असंख्य साहित्यकृतीतून मांडणा-या व आपल्या विविध चळवळीच्या माध्यमातून बहुजनांचे जीवन सुखकर करण्यासाठी संपुर्ण हयातभर कार्यकरणा-या अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व कार्याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाचे क्षेत्र व मर्यादा-**

अण्णाभाऊ साठे जीवन साहित्य आणि कार्य या अनुषंगाने अध्ययन करत असताना केवळ अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन साहित्य आणि कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे ही संशोधनाची मर्यादा आहे.

**नमुना निवड-**

आधुनिक कालखंडातील भारतीय समाजातील बहुजन शोषित वंचितउपेक्षीत घटकांच्या समस्या आपले साहित्य व जीवन कार्यातून सोडविण्णसाठी अनेक समाज सुधारकांनी कार्य केलेले आहे. त्या पैकी एक भाऊराव तुकाराम उर्फ अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन साहित्याचा केलेल्या कार्याचा नमुना म्हणून निवड करयात आली.

**तथ्य संकलनाची साधने-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्य संकलन करताना दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यात संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, वर्तमानपत्र, मासिक, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे-



Scanned by TapScanner

प्रस्तुत संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त हाण्यासाठी खालील उद्दिष्ट निश्चित करण्यात आली.

१. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन संघर्षाचा आढावा घेणे.

२. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यकृती विषयी माहिती जाणून घेणे

३. अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

**संशोधन गृहितके-**

१. अण्णाभाऊ साठे यांचा जीवन प्रवाहअत्यंत संघर्षमय व वेदनादायी होता.

२. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या अद्वितीय सृजनशिलतेच्या माध्यमातून साहित्यकृतीचा गड निर्माण केला.

३. समाजातील उपेक्षीत वंचित शोषित घटकांच्या कल्याणासाठी त्यांनी आपल्या वैयक्तीक दुःखाचा विचार न करता अण्णाभाऊ साठे जीवनभर कार्य करत राहिले

**माहितीचे विश्लेषण-**

**अण्णाभाऊंचा जीवन प्रवास -**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे म्हणजे जातिभेदामुळे जातिच्या उतरंडीमुळे, शिक्षणा पासुन, समग्र विकाससाच्या वंचित राहिलेल्या मातंग समाजातहल एक समृध्द व्यक्तीमत्व त्यांचा जनम ०१ ऑगस्ट १९२० रोजी आई वालुबाई व वडील भाऊराव साठे यांच्या पोटी वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली येथे झाला. जाती व्यवस्थेच्या उतरंडी मुळे गावकुसाबहेर मांगवाडयात अत्यंत दरिद्री अवस्थे मध्ये त्यांचा जन्म झाला. पुत्रप्राप्तीमुळे आई वालुबाई व वडील भाऊराव सिध्दोजी साठे अत्यंत आनंदात होते. त्यांनी या पुत्राचे नाव तुकाराम असे ठेवले. गावाचे नोकर म्हणून सामाजिक व्यवस्थेच्या कायदयाने मांग समाजातील लोकांना मान्यता दिली होती. या लोकांनी प्रतिष्ठेची कामे नाकारली होती. शेती आणि मजूरी करणे त्यांच्यासाठी गुन्हा होता. त्यामुळे त्यांच्या घरात तलवारी आणि दारिद्रयच नांदत होते. मजूरी किंवा दुसरे कोणतेही काम नसल्यामुळे भुकेने यांची लहान लहान मुले रडत तर म्हातारी माणंस टाचा घासुन मरत तर त्या मृत प्रेतांच्या कफना करिता त्यांच्याकडे पै पैसा नसे. तरुण लोक तसेच पाणी पिऊन दिवस काढत भूकेच्या विवचनेतूनच मग काही तरुण पोर आपल्या जीवावर उदार होवून दूरदूरच्या शेतात जाऊन त्या शेतात मिळेल ते पिक आणून आपल्या पोटाची आग विझवत होती. अशा प्रकारे भूक भागविण्यासाठी चोरी, लुटमार, करणे हा एकमेव उपाय त्यांच्या जवळ होता. त्यामुळे त्यांच्याजातीवर ब्रिटीशांनी गुन्हेगार जमात म्हणून शिक्कामारला या गुन्हेगारीच्या कायदयामुळे मातंग समाजातील लोकांना माणूसकीचे जीवन जगता येत नव्हते. परिसरात कुठेही दरोडा पडला किंवा चोरी झाली की पोलीस लगेच आण्णाभाऊंच्या वस्तीत येऊन लोकांची धरपकड करायचे. अशावेळी घरातील पुरुष - बायका दिवस दिवस डोंगरात जाऊन लपायचे आण्णाभाऊंचा जन्म झाला तेंव्हा त्यांचा मामा फकिरा याने असाच एका ठिकाणी दरोडा टाकुन खजिना लुटला होता व दोन ओंजळी कलदार रुपये आपल्या बहिणीच्या व आण्णाभाऊंच्या उदरनिर्वाहासाठी बहिणीच्या ओटीत टाकले. आण्णाभाऊंचे वडील भाऊराव हे पोटपाण्यासाठी मुंबईत रहात त्या मुळे आण्णाभाऊंची आई व घरतील मोठे लोक दोर वळण्याच्या कामाला जात व ते वळलेले दोरखंड भाकरीच्या तुकडयावर किंवा अण्यादोन अण्याला विकून आपली उपजीविका भागवीत. खालच्या जातीतील म्हणून गावात कुणाला शिवायचे नाही. हातात हात मिळवायचा नाही. हे आण्णानी लाहनपणी पाहिले अनुभवले. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांच्या

ISBN : 978-93-88732-09-3

वडीलांच्या इच्छेखातर त्यांनी शाळेत प्रवेश घेतला. परंतु शिक्षकांच्या निर्दयी पणामुळे व जातीभेदाच्या अनुभवामुळे त्यांनी दोन दिवसातच शाळे कडे पाठ फिरवीली.

**अण्णांचे छंद व आवडी-**

लहान पणा पासुन अण्णाना विविध छंद होते. मैदानी खेळ, गर्दी पासुन दूर डोंगर द-या ,राने, नदया या ठिकाणी भटकणे त्यांच्या आवडीचे होते.त्यातूनच पक्षि निरिक्षण, शिकार करणे , मध गोळा करणे मासेमारी, पक्षांशी मैत्री जंगलातील पाना फुलां मधिल सुक्ष्म फरक शोधणे असे अनेक छंद त्यांना होते. जत्रा मध्ये जाऊन तिथल्या गोष्टीचे निरीक्षण करणे त्यांच्या आवडीचे काम होते. नंतर पाठांतराची भर पडली. लोकगीते,पोवाडे, लावण्या पाठकरणे व इतरांना सांगणे हा त्यांचा आवडीचा छंद होता.

**कामाच्या शोधात मुंबईला प्रयाण-**

सन १९३२ मध्ये महाराष्ट्रा मध्ये दुष्काळ पडला अनेक लोक भुकेने पटापट मरत होते. अशा वेळी वयाच्या १२ व्या वर्षी अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कुटुंबीया सोबत वाटेगाव ते मुंबई असा पायी प्रवास केला. मुंबईत पोटासाठी वणवण भटकत असताना अण्णांनी हमाल, बुट पॉलिशवाला,घरगडी,हॉटेलबॉय, कोळसे वाहक,डोअर किपर,कुत्र्याला सांभळणारा, मुलांना खेळविणारा, उधारी वसुली करणारा, खाण कामगार, ड्रेसिंग बॉय अशी नाना प्रकारची कामे केली. त्याच दरम्यान त्यांना सिनेमा पाण्याचा छंद लागला . या छंदानेच त्यांना साक्षंर बनविले.

**अण्णाभाऊंचे कुटुंब**

अण्णाभाऊंना दोन पत्नी होत्या पहिल्या पत्नीचे नांव कोंडाबाई असे होते. तिच्या पासुन त्यांना मधुकर नावाचा मुलगा झाला तर त्यांच्या दुस-या पत्नीचे नाव जयवंताबाई असे होते. त्यांना शांता आणि शकुंतला अशा दोन मुली होत्या. अण्णाभाऊंचे वैवाहिक जीवन समाधानकारक नव्हते. जीवनाच्या शेवटच्या टप्पात तर ते अगदी एकाएकी वैफल्यग्रस्त जीवन जगले.

**अण्णाभाऊंचे साहित्य**

अण्णाभाऊ साठे यांनी ३७ कादंब-या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवास वर्णन ,१३ कथा संग्रह, १४ लोकनाटये, १० प्रसिध्द पोवाडे, १२ उपहासत्मक लेख लिहीले. सन १९५० ते १९६२ हा त्यांच्या साहित्य क्षेत्रातील सुवर्णकाळ होता. याच काळात त्यांच्या पुस्तकांच्या अनेक आवृती निघाल्या.

अण्णाभाऊंच्या साहित्यात ग्रामीण,दलित,महिला या समाजाच्या शोषित वर्गाच अनूभव धिष्ठित चित्रण आढळंत अण्णाभाऊंनी कनिष्ठ आणि ग्रामीण जनतेच विश्व साहित्यात आणलं अण्णाभाऊ साठे हयांचा साहित्यिक पिंडच मुळात सामाजिक जीवन जाणीवांचा आहे. जीवनाच्या आगीतून तावून सुलाखून निघत असताना अर्थात सन १९४४ मध्ये अण्णाभाऊंच्या वैचारिकतेला धार आली. या काळात अण्णाभाऊ शिवाय दलितांच्या जीवन जाणीवांच शाश्वत सत्य शाहिरी वाड्.मयातून मांडणारा एक ही शाहिर आख्या महाराष्ट्रात नव्हता. साहस या गुंणाच चित्रण त्यांच्या अनेक कांदब-यातून आढळते. फकिरा या त्यांच्या सर्वाधिक प्रसिध्द व पुरस्कार प्राप्त कादंबरीत त्यांनी आपले ख-या आयुष्यातीले मामा फकिरा राणोजी मांग यांची साहसी जीवन कथा मांडली आहे. फकिरा ही कादंबरी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीस अपर्ण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मागोवा घेताना ते दलित जनतेला काय सांगुन गेले हे विशद करताना आण्णाभाऊ म्हणतात. **जगबदल घालुनी घाव सांगून गेले मज भिमराव करी प्रगट निज नाव |**



Scanned by TapScanner

ISBN : 978-93-88732-09-3

**सांगुन गेले मज भीमराव** वारणेच्या खो-यात या त्यांच्या कादंबरीत स्वातंत्र्यासाठी अंदोलनात हौतात्म्य पत्करणारा तरुण आणि त्याच्या प्रेयसीची कथा आहे.

एका लावणीतून ते शेतक-यांना जग बदलविण्याचे आव्हान करतात-

तू मराठा मोळा शेतकरी घोंगडी गिरी |

जूनी ती काठी जूनी लंगोटी |

बदल ली दुनिया सारी रे

चल बदल ही दुनिया साठी रे ||

तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर त्यांची गायलेली एक लावणी ती अशी

माझी मैना गावावर राहिली |

माझ्या जीवाची होती या काहिली ||

**अण्णाभाऊंचे कथा संग्रह**

निखारा नवती, फरारी, पिसाळलेला कुत्रा जिवंत काडतुस, आबी, खुळवंडा, गजाआड, बरबाद या कंट्राती चरानगरीची भुत, कृष्णाकाठच्या कथा,

**कादंब-या** चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, चिखलातील कमल, रानगंगा, माकडीचा माळ, वैजयंता, रत्ना,रुपा,गुलाम, चंदन , मधुरा,आवडी, वैर,पाझर,आग, आघात, अलगुज, अहंकार,मास्तर,मूर्ती, जीवंत काडतूस, अग्नीदिव्य, ठासलेल्या बंदुका, सरनौबत इ.

**लोकनाटय-** अकलेची गोष्ट,देशभक्त घोटाळे, शेटजीचे इलेक्शन, पुढारी मिळाला, लोकमंत्र्याचा दौरा, माझी मुंबई , खाप-याचोर, मूक मिरवणूक.

**नाटके-** इनामदार, पेग्यांच लगीन,सुलतान,

**प्रवासवर्णन-** माझा रशियाचा प्रवास-

**काव्ये-** अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या

अण्णाभाऊनी आपल्या साहित्यातून मराठी व भारतीय साहित्य संस्कृतीच्या उच्चभू पांढरपेशा कक्षा रुंदावल्या त्यामुळे त्यांचे साहितय इंग्रजी, रशिया, फ्रेंच, झेकइत्यादी जार्गातिक भाषात अनुवादीत झाले.

**अण्णाभाऊ साठे यांचे कार्य**

अण्णाभाऊ साठे यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तसेच गोवा मुक्ती संग्रामाच्या वेळी ही जनजागृतीचे प्रचंड काम केले. एक कलाकार म्हणून तसेच एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणूनही ते प्रत्येक उपक्रमात, अंदोलनात सहभागी होत असत. चलेजाव चळवळीच्या काळात वाटेगावात बर्डे गुरुजींच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या घडामोडीत अण्णाभाऊ सामिल असल्यामुळे त्यांच्यावर वॉरंट निघाले आणि परिणामी त्यांना कायमचे घर सोडावे लागले. त्यांनी कम्युनिष्ठ पक्षाचे पूर्णवेळ काम केले. पक्ष कार्यात पूर्णपणे झोकुन देवून लालबावटा कला पथकाची स्थापना करुन समाज प्राबोधनाचे कार्य केले.

अण्णाभाऊंनी दलित कष्टकरी यांना सांगितले की, तु गुलाम नाहीस तूच विश्वाचा निर्माणकर्ता आहेस आणि हे विश्व तुझ्या हातावर तरलं आहे अण्णाभाऊंचे साहित्य सामाजिक परिवर्तनशील आहे .साहित्याच्या माध्यमातून त्यांनी शोषित पीडीत समाजाचे नेतृत्व केले हे करत असताना त्यांनी बुध्द,मार्क्स, फुले आणि आंबेडकर यांचा वैचारिक वारा घेवून येथील पारंपारीक जाती व्यवस्था आणि अर्थव्यवस्था



Scanned by TapScanner

यांच्याशी सतत संघर्ष सुरु ठेवला. दलितांना कष्टक-यांना कामगारांना स्वाभीमानाने जीवन जगण्याचे शिकवले अण्णाभाऊ साठी यांनी आपल्या मागण्यातून पोवाडयातून अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांना राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले आहे.

**समारोप-**

अण्णाभाऊ साठे प्रसिध्द मराठी साहित्यीक शाहीर व समाज सुधारक होते, वर्ग विग्रहाचे तत्वज्ञान सर्व सामा न्य जनापर्यंत पोहचविणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिध्दहस्त कादंबरीकार, लोकनाटयकार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. जातीच्या उतरंडीमुळे शिक्षणापासुन व समग्र विकासा पासुन वंचित राहिलेल्या मातंग समाजातील एक प्रसिध्द,व्यक्तीमत्व यांनी आयुष्याच्या उणीपुरी एकोणपन्नास वर्षे जगून एंशीच्यावर साहित्यकृतर पुस्तकांची निर्मिती केली, त्यांचे नावही या देशात कुणाचा माहिती नसावे आणि संपूर्ण हयात भरात ५-१० पुस्तके लिहिणा-या व्यक्तीचे साहित्यिक म्हणून गाडवे गाणे ही देशांची फार मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या वैयक्तिक दुःखच विचार न करता आपले विचार कार्य हा प्रतिभा यांच्या साहित्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारे आणि वंचितानाच्या व्यथा प्रभावीपणे राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या साहितयकृती मांडणा-या या महान साहित्यिकांचा अंत वैफल्याग्रसत जीवन व उपासमारी मुळे होणे ही आपल्या समाजाची खूप मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.

**संदर्भसूची -**


१. नानासाहेब कठाळे (२०१३) अण्णाभाऊ साठे जीवन आणि साहित्य समता प्रकाशन नागपूर.

२. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाड्.मय माराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

३. बजरंग कोरडे अण्णाभाऊ साठे साहित्य अकादमी प्रकाशन

४. अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या प्रकाशक लोकवाड्.मय गृह




Scanned by TapScanner